# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३५५-२२ — दिनांक २५/११/२०२२

## बंदी असलेल्या ईलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्रेत्यांवर ०३ ठिकाणी छापा मारुन लाखो रुपयांचा अवैध माल जप्त.

## मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हददीत शाळा, कॉलेजमधील विदयार्थी तसेच तरुणांमध्ये ईलेक्ट्रॉनिक सिगारेट पिण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत असल्याने त्याबाबत पोलीस उपायुक्त, गुन्हे यांनी आढावा घेवून अशा ई सिगारेट विक्री करणा-यांचा शोध घेवून त्यांचेवर तात्काळ कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या सुचनेप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. नितीन बेंद्रे व पथक यांनी ईलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्रेते यांचेबाबत गोपनीय माहिती प्राप्त करुन नयानगर पोलीस ठाणे हद्दित दिनांक २२/११/२०२२ रोजी हैदरी चौक येथील हैदरी कॉम्प्लेक्स बिल्डींगचे शॉप नं. १६, अल नजमा नावाचे दुकानावर छापा मारुन विक्रेता शाबान युनुस शेख, वय २५ वर्षे याचे ताब्यातुन २,१५,२००/- रु. किंमतीच्या ई सिगारेट व दिनांक २३/११/२०२२ रोजी नयानगर पोलीस ठाणे हददीतील कार्पोरेशन बँक चौका जवळील अजिता इमारत मधील शॉप नं ०३ मध्ये युनिर्व्हसल दुकानावर छापा मारुन विक्रेता आजीम आशाद मिर्जा, वय ३२ वर्षे याचे ताब्यातुन १,५५,०००/- रु किंमतीचा ई-सिगारेटचा साठा जप्त केला. तसेच दिनांक २४/११/२०२२ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत पुनम क्लस्टर नंबर १, नित्यानंद नगर, मिरारोड येथील सैफ पान शॉप मध्ये शहनवाज मुजम्मील हुसेन शेख, वय ३७ वर्षे याचे ताब्यातून १,७०,०५०/- रुपये किंमतीचा मानवी आरोग्यास अपायकारक असलेल्या व भारतामध्ये प्रतिबंधीत परदेशी बनावटीच्या ई सिगारेटचा साठा जप्त केला आहे. अशाप्रकारे मध्यवर्ती गुन्हे शाखेने दिनांक २२/११/२२ ते दिनांक २४/११/२२ या कालावधीत एकूण तीन ठिकाणी छापा कारवाई करुन एकूण ५,४०,२५०/- रु. किमतीच्या प्रतिबंधीत परदेशी बनावटीच्या ई सिगारेटचा साठा जप्त केला आहे. सदरबाबत The Prohibition of e-Cigarettes (Production, manufacture, import export, transport, sale, distribution, storage and advertising Act 2019 ) चे कलम ४,५,७,८ अन्वये नयानगर पोलीस ठाणे येथे अनुक्रमे गु.र.क्र. ८३३/२०२२ व गु.र.क्र. ८४०/२०२२ असे ०२ गुन्हे व काशिमीरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८१८/२०२२ असे एकूण ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय तर्फे सर्व पालकांना आवाहन करण्यात येते की, ईलेक्ट्रॉनिक सिगारेटचे व्यसन मानवी आरोग्यास खास करुन अल्पवयीन मुलांचे आरोग्यास फारच हानीकारक आहे. यासारख्या व्यसनांना आपली मुले बळी पडू नये याकरीता पालकांनी आपल्या मुलांना याबाबत जागृत करावे. तसेच ईलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्रेते यांचेबाबत माहिती प्राप्त झाल्यास पोलीसांना तात्काळ माहिती दयावी .

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. श्री राहुल राख, स.पो.नि. नितीन बेन्द्रे, पो.हवा. मनोहर तावरे, सुनिल कुडवे, राजविरसिंग संधु, प्रविणराज पवार, अनिल नागरे, महेश वेल्हे, पो.अं. अजय रणदिवे यांनी केलेली आहे.

---ooo---